**<u>नियमित दिवाणी दावा क्र.८१/२०१८</u>**
(CNR No.MHKO120003692018)

## निशाणी क्र.३१ खाली आदेश

वादी यांनी सदर अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०६ नियम १७ प्रमाणे त्यांच्या दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी केलेला आहे.

०२. वादीच्या कथनानुसार, प्रस्तुत दावा वादी यांनी प्रतिवादींच्या विरुध्द वाटपाकरीता दाखल केलेला आहे. तथापी सदर दाव्यामध्ये काही स्पष्टोक्ती करणा-या महत्वाच्या बाबी नमुद करणेचे अनावधानाने राहुन गेले असलेने वादी यांना पुढीलप्रमाणे दावा दुरुस्ती करणेची परवानगी मिळणेची विनंती केली.

प्रस्तुत दाव्यातील कलम २ नंबर कलम २अ) म्हणुन पुढीलप्रमाणे मजकुर नमुद करणेस परवानगी मिळणेची विनंती केली.

''२अ) वादी व प्रतिवादी हे वाडवडिलार्जित मिळकती संदर्भात आपापल्या कुटुंबामध्ये आपसात वाटाघाटीने केलेल्या वाटपाप्रमाणे ७/१२ पत्रकी आपापल्या नावाची नोंद करुन घेतली असुन त्याप्रमाणे मिळकती वहिवाटीत आहेत. दावा मिळकत सोडुन उर्वरीत वाडवडिलार्जित मिळकती या पिकाऊ जमिनी असलेने त्या संदर्भात वादी व प्रतिवादी अथवा त्यांचे पुर्वहक्कदारांचे दरम्यान अलाहिदा वाटप झाले आहे, मात्र दावा मिळकत ही माळरान असलेने व ती जनावरांचे चा-याकरीता गवत पड म्हणुन सर्वांच्या समाईक वहिवाटीस ठेवली असलेने त्याबाबत आजतागायत वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान वाटप झालेले नव्हते व नाही. दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकी भोगवटादार म्हणुन नोंद असलेल्या इसमांची समाईक वहिवाट चालु आहे.''

०३. सदरची दुरुस्ती ही फॉर्मल स्वरुपाची असुन त्यामुळे वादी व प्रतिवादी यांचेमधील वाद अंतिमरित्या संपुष्टात येणेस व दाव्याचा निर्णय योग्य रितीने होणेस मदत होणार आहे. सबब वरीलप्रमाणे दावा दुरुस्तीस परवानगी मिळणेची वादींनी विनंती केली.

०४. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र.१ ने निशाणी क्र.३२ वर आपले म्हणणे दाखल करुन वादीने मागणी केलेल्या दुरुस्तीस त्यांची तीव्र हरकत असल्याचे नमुद केले आहे. प्रतिवादी क्र.१ चे कथनानुसार, वादींनी सुचविलेली दुरुस्ती ही वादींच्या मुळ दाव्यातील कथनांशी विसंगत स्वरुपाची आहे. वादी व प्रतिवादी यांचे कुटुंब हे केव्हाही हिंदु एकत्र कुटुंब नव्हते. तशी वादी यांची मुळ दाव्यामध्ये कोणतीही केस नव्हती व नाही. त्याकारणाने मुळ दाव्यामध्ये त्यांनी वादी व प्रतिवादी यांची वंशावळ दाखल केलेली नाही. त्याकारणाने वादी व प्रतिवादी यांच्या कुटुंबामध्ये वाटप होणेचा प्रश्नच उद्भवत नाही. दावा गट क्र.१०४३ ही वादी व प्रतिवादी यांच्या पुर्वहक्कदारांनी दि.०५/०७/१९४८ रोजीच्या खरेदीपत्राने समाईकात खरेदी घेतलेल्या मिळकतीचा भाग होती व आहे. सदर खरेदीपत्राप्रमाणे खरेदी घेतलेल्या संपुर्ण मिळकतीचे अद्याप सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. त्याकारणाने दावा मिळकतीसोबत सदर सर्व खरेदी मिळकतींचे वाटप होणे कायद्याने आवश्यक असलेने व वादींनी त्या मिळकती दाव्यामध्ये समाविष्ट केलेल्या नसलेने वादीचा दावा फेटाळणेस पात्र असलेचे प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये नमुद केलेले आहे. सदर मजकुराप्रमाणे उघड झालेली उणीव भरुन काढण्यासाठी वादींनी प्रस्तुतचा खोट्या दुरुस्ती अर्जाची रचना केलेली आहे. सबब सदर अर्ज फेटाळणेची विनंती प्रतिवादी क्र.१ ने केली.

०५. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

०६. दोन्ही बाजुंच्या विधिज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने खालील प्रश्नबिंदु माझ्या निदर्शनास येतात. सदर प्रश्नबिंदु त्यावरील निष्कर्ष व कारणमीमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदु** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | वादी मागणी प्रमाणे दावा दुरुस्तीचा आदेश मिळण्यास पात्र आहेत का ? | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २) | काय आदेश ? | **<u>अंतिम आदेशाप्रमाणे</u>** |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>प्रश्नबिंदु क्रमांक १ व २ करिता कारणे</u> :- (दावा दुरुस्ती व आदेश)

०७. प्रश्नबिंदु क्र.१ व २ हे एकमेकांशी निगडित असल्याने त्यांच्या कारणांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता ते चर्चेकरीता एकत्रित विचारात घेण्यात आले आहेत.

०८. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता दावा दुरुस्तीच्या अर्जाच्या कामी दाव्यातील गुणदोषांवर भाष्य करणे योग्य ठरत नाही व प्रस्तुत दुरुस्तीच्या अर्जाने जर दाव्यातील वस्तुस्थिती अभिलेखावर येण्यास मदत होत असेल व प्रकरणातील पुढील अडचणी टाळण्यासाठी तसेच बहुविध दाव्यांची संख्या कमी करण्यासाठी मदत होणार असेल तर दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर करणे योग्य ठरेल. तसेच, सदर दुरुस्तीनंतर प्रतिवादींना सुद्धा त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी मिळणार आहे. तसेच प्रकरणामध्ये दावा मिळकतीशी संबंधीत सर्व माहिती अभिलेखावर असणे अत्यावश्यक आहे.

०९. दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ मधील आदेश ६, नियम १७ मधील तरतूदीनुसार न्यायालयीन कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोंपैकी कोणत्याही पक्षकारास त्याच्या वाद कथनास न्याय असेल अशा रीतीने फेरबदल करण्याची मुभा देता येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील त्याप्रमाणे सर्व सुधारणा केल्या पाहिजेत. त्यामुळे, प्रकरणातील पुढील अडचणी टाळण्यासाठी तसेच बहुविध दाव्यांची संख्या कमी करण्यासाठी सदर अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. त्यामुळे उपरोक्त सर्व बाबींचा विचार करून मी खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने पुढील नेमल्या तारखेपर्यंत अर्जात नमूद केल्याप्रमाणे त्याच्या दाव्यामध्ये दुरुस्ती करावी.

३. वादीने दुरुस्त दाव्याची प्रत मुदतीत अभिलेखावर सादर करावी.

Digitally signed by VASIM BURAN MULLA
Date: 2023.09.15 12:53:33 +0530

**( व्ही. बी. मुल्ला )**

दि. १५/०९/२०२३

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी